वर्ष १४ • अंक १२ • १६ एप्रिल २०१५

किंमत रु. १५/–

# पालकनीती

पालकत्वाला वाहिलेले मासिक



**पा ल क नी ती**

पालकत्वाला वाहिलेले मासिक

**संपादक**
संजीवनी कुलकर्णी

**संपादक मंडळ**
प्रकाश अनभूले
मधुरा राजवंशी
वसीम मणेर
सोमीनाथ घोरपडे
नीला आपटे
मंजिरी निंबकर

**मुखपृष्ठ, अंक मांडणी व रेखाटने**
वसीम मणेर

**छायाचित्रे**
परेश जयश्री मनोहर
वसीम मणेर

**अक्षरजुळणी**
स्वाती जामदार

**जानेवारी ते डिसेंबर २०१५ साठी वर्गणी रु.२००**

वर्गणीचा चेक / ड्राफ्ट 'पालकनीती परिवार' या नावाने काढावा.

**संपर्क :**
**पालकनीती परिवार,**
प्रगत शिक्षण संस्था
रिंग रोड, लक्ष्मीनगर,
फलटण ४१९५२३
०२१६६ २२३०४१


psspalakneeti@gmail.com
www.palakneeti.org

पालकनीती परिवाराचे प्रकाशन
वर्ष १४ वे अंक १२ वा
१६ एप्रिल २०१५

लेखांत व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावीत.


## या अंकात


- **माझी भिंत, माझे घर; माझे रंग, माझे कर** – समीक्षा संध्या मिलिंद
- **आम्हाला 'रिच' बालपण मिळालं** – अनुजा जोशी
- **पडद्यावरचे बालमजूर** – प्रकाश अनभूले
- **अरे, प्रकल्प प्रकल्प** – सुबोध केंभावी
- **चार भिंतींत न मावणारी मुले** – विठ्ठल कदम
- **विचार करून पाहू – खेळ!** – नीलिमा गोखले, मंजिरी निंबकर
- **शहाणी वेबपाने – काळ्या फळ्यावरची रंगीत अक्षरे!** – मधुरा राजवंशी




चित्र काढणं आणि रंगवणं हे सगळ्याच लहान मुलांना आवडतं, तसंच कबीरलाही! सुरुवातीला भिंतीवर रेघोट्या, मग आकार यायला लागले. घरात हॉलपासून सगळीकडेच कबीरचे ठसे उमटायला सुरुवात झाली. आकारासोबत वेडीवाकडी चित्रे सुरू झाली. मग हळूहळू अंगणवाडीत गेल्यामुळे पाटीवर हे उतरवलं गेलं. मग काही दिवसांनी ही मज्जा कागदावर सुरू झाली. (पान ४ वर)






संपादक, मुद्रक, प्रकाशक व मालक – डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी पालकनीती परिवार करिता ग्रीन ग्राफिक्स, सी–१०२, सुनिता अपार्टमेंट, १४१७ कसबा पेठ, पुणे–४११०११ येथे छापून घेऊन अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, कर्वे रस्ता, पुणे–४११००४, येथे प्रकाशित केले.

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

# संवादकीय

नुकत्याच दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा पार पडल्या. लगेच पेपर तपासणाऱ्या शिक्षकांच्या दारी पेपरचे बाड येऊन पडले. पेपर तपासणाऱ्यांमध्ये एखादा संवेदनशील शिक्षक असेल तर मुलांनी सोडवलेले पेपर पाहून सुन्न होऊन जातो. गेली दहा वर्षे या मुलांनी नक्की काय आत्मसात केले, या विचारात जाऊन परीक्षा पद्धतीच्या यंत्रणेपासून ते परीक्षा कशासाठी इथपर्यंत प्रश्नांची हजेरी सुरू होते.

आपला इतिहास असे सांगतो की आपल्याला पहिल्यांदा सर्वांसाठी शिक्षण ब्रिटिशांनी उपलब्ध करून दिले. त्या काळाला आणि समाजाला योग्य अशी शिक्षण-पद्धती त्यांनी विकसित केली. जसजसा काळ, गरजा आणि जग बदलत गेले तसे त्या पद्धतीमध्ये बदल होणे अपरिहार्य होते. मात्र भारतात गेल्या ६७ स्वातंत्र्योत्तर वर्षांत तसे झाले नाही. एखाद्या पेपर अथवा चाचणीवर विद्यार्थ्यांच्या सर्व क्षमता तपासणे हे खरे तर आतापर्यंत कालबाह्य होणे गरजेचे होते. पण अजूनही आपण त्याच पद्धतींच्या आहारी गेलो आहोत. अध्ययनाचे आणि अध्यापनाचे नवीन तंत्र विकसित होणे आवश्यक होते आणि आहे. जेव्हा अध्ययनाचे तंत्र बदलते तेव्हा अर्थातच मूल्यमापनाच्या पद्धतीही बदलायला हव्यात. परीक्षांचे अवाजवी स्तोम आणि त्यातून होणारी जीवघेणी स्पर्धा या दोन्ही गोष्टी आज बाजूला सारल्याच गेल्या पाहिजेत. प्रत्येक विद्यार्थ्याच्या अंगी असणारी सृजनशीलता ओळखून त्याला प्रोत्साहन देऊन त्याचा सर्वांगीण विकास साधता येतो हे आज आपण सिद्ध करू शकतो. तसे प्रयोग करणाऱ्या अनेक प्रयोगशील शाळा आज अस्तित्वात आहेत. त्यांच्या कामाकडे पाहून कुणीतरी परीक्षा पद्धती आणि त्याचे महत्त्व याची चाचपणी करणे खरेच आजची गरज होऊन बसली आहे.

'आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे त्यामुळे सर्व बाबतीत तयारी करायला हवी, 'जग झपाट्याने बदलत आहे. आमच्या वेळी असे नव्हते.' 'आम्ही खूप अभ्यास करायचो,' 'आमचे गुरुजी आमची तयारी करून घ्यायचे, त्यांचा खूप दरारा होता. आता ते उरले नाही.' 'मुळात परीक्षाच नाही म्हटल्यावर शिक्षक निवांत व मुलांना अभ्यास न करायला मोकळीकच.' अशी चर्चा आपल्याला ऐकायला मिळते. आणि शेवटी परीक्षा या व्हायलाच पाहिजेत यावरच येऊन गाडे अडते. या जीवघेण्या स्पर्धेतून त्या बिचाऱ्या मुलाला काही सुटका मिळत नाही. खरे तर प्रत्येक मानवी जीव हा जन्मत:च विनर आहे. या जगात येतानाच तो आपल्या स्वतःच्या अगदी वेगळ्या अशा क्षमता घेऊन येतो. त्या क्षमतांना फुलवायला योग्य वातावरण देणे हेच खरे तर कुटुंब, शाळा आणि समाजाचे काम असते. स्पर्धेच्या ताणाने उपजत क्षमताही कोमेजून जातात. शिक्षणाचे खरे ध्येय हे प्रत्येकाची उन्नती आणि त्याचा उद्या हा आजच्यापेक्षा अधिक चांगला असणे हे आहे. यात मी कुणापेक्षा पुढे किंवा मागे हे येतेच कुठून? मुलांना अनुभवांची चिकित्सा करण्याचे कौशल्य आत्मसात व्हावे. त्यासाठी साचेबद्ध परीक्षाच राबवल्या पाहिजेत असे नाही. मुलांनी साक्षर व्हावे, नवनवीन गोष्टी शिकाव्यात, त्यात प्राविण्य मिळवावे आणि त्याचसोबत त्यांच्यामध्ये प्रेम, मैत्री, सहकार आणि सहजविकास ही मूल्येही शाळा व समाजातून रुजावीत.

२००९ साली केंद्र शासनाने सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे विधेयक आणून एक प्रकारे उशिरा का होईना पण क्रांतिकारी पाऊल उचलले. यामुळे शालेय व्यवस्थापनाचे संपूर्ण तंत्रच बदलले. यामध्ये प्रामुख्याने मूल्यमापन पद्धतीत आमूलाग्र बदल झाला आणि परीक्षेचे भूत काही अंशी विद्यार्थी, पालक व शिक्षकांच्या मानगुटीवरून उतरले. यासाठी परीक्षेला पर्याय काय असेल यावर वेगवेगळ्या पातळीवर विचारमंथन सुरू झाले. त्यात सर्वच स्तरातून मुलांना त्यांच्या मनाप्रमाणे आवडीच्या विषयात आपले करिअर करण्याची संधी द्यायला हवी असाच सूर आला. वेगवेगळ्या गटचर्चा, परिसंवाद, प्रात्यक्षिके यांच्या माध्यमातून मूल्यमापनाच्या पद्धती समोर आल्या. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे काम करायला देऊनच त्यांच्या कौशल्याचे मूल्यमापन करण्याची गरज आहे. नुसते उठसूठ 'आनंददायी' शिक्षण म्हणत बसण्यापेक्षा त्यांना त्यांच्या आवडीने नवनिर्मिती करू द्यायला हवी. परीक्षेमध्ये मुले पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमाची घोकंपट्टी करतात व त्यातून जास्तीत जास्त गुण मिळवण्याचा प्रयत्न करतात. पालकही त्यासाठी मुलांवर दबाव टाकून स्वतःही प्रचंड तणावाखाली वावरताना दिसतात. खरे तर या विद्यार्थीदशेतच त्यांना चांगले पोषक वातावरण देऊन, आज अस्तित्वात असलेल्या परीक्षेच्या जाळ्यातून बाहेर काढून फुलवणे शक्य असते.

शिक्षण आणि परीक्षा पद्धती बदलेल तेव्हा बदलेल. निदान या परीक्षेच्या मोसमात (आणि इथून पुढच्याही) एक पालक, शिक्षक, दोस्त म्हणून परीक्षार्थींवर कोणताही दबाव आपण टाकणार नाही आणि रोजच्यासारखे नॉर्मल जगायला त्यांना मदत करू एवढे तरी ठरवूया.

# माझी भिंत, माझे घर माझे रंग, माझे कर

– समीक्षा संध्या मिलिंद



समीक्षा संध्या मिलिंद या व्यवसायाने क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट आहेत. सध्या त्या भारत ज्ञान विज्ञान समुदायामध्ये कार्यरत आहेत. तसेच तळेगाव दाभाडे येथील नगर परिषदेच्या एका शाळेतील मुले व पालक यांच्यासोबतही त्यांचे काम चालू आहे. नाट्यक्षेत्रात त्यांना विशेष रस आहे.

आधीच्या घरातील एक भिंत आम्ही खास कबीरला चित्र काढणं आणि रंगवणं यासाठी ठेवली होती. त्यावेळी ती फक्त चित्रांनी भरली होती. आता राहतो त्या घरातही एक खांब आख्खा त्याला चित्र काढायला ठेवलाच! त्यावर हळूहळू चित्रांबरोबर अक्षरं, शब्द मग वाक्यं यायला लागली. कुठेही आम्ही पालक म्हणून हे लिही किंवा ते लिही किंवा हे चित्र काढ असं सांगितलं नाही. बऱ्याचदा त्यानं काढलेल्या 'मॉडर्न आर्ट' चा अर्थ त्याच्याकडून समजून घ्यावा लागला.

मागच्याच महिन्यात पूना बिनाले यांनी भिंत रंगवण्याचा सामूहिक कार्यक्रम घेतला. मुख्य म्हणजे ही स्पर्धा नसल्यामुळे मुलांना आपणहून व्यक्त होण्याची संधी होती. त्यात कबीरचाही सहभाग होता. तिथं भिंती रंगवताना मुलांचा गोंगाट, रंग वापरणं, ब्रश वापरण्याच्या पद्धती बघत राहण्यासारख्या होत्या. वेगवेगळ्या वयोगटातल्या मुला-मुलींनी काढलेल्या चित्रांनी भिंतीचं वेगळेपण उठून दिसत होतं.

तेव्हा कबीरच्या डोक्यात आलं, आपण बाल्कनीतली भिंत रंगवूयात का? आम्ही त्याला होकार दिला आणि रंग आणण्याची मोहीम सुरू झाली. मोहीम यासाठी की लगेच रंग आणण्याची घाई न करता थोड्या-थोड्या दिवसांनी रंग आणले. जेणेकरून खरंच रंगवायचं आहे का नुसतंच म्हणतोय हे आम्हाला बघायचं होते. दोन -तीन सुट्ट्यांच्या दिवशी ठरवून बारगळलं.

शेवटी एका शनिवारी हा सोपस्कार पार पाडण्याचं ठरवलं. त्याच्यापेक्षा आम्हालाच जास्त मज्जा वाटत होती या कार्यक्रमाची! दोन इंच, तीन इंचाचे ब्रश आणले. रंग ठरवले. मुख्य तीनच रंग आणले- लाल , पिवळा आणि निळा! शनिवारी त्याला एकट्यालाच रंगवायचं होतं त्यामुळं त्याला मदत करून आम्ही बाजूला झालो. रंगवताना कबीरनं तीन रंगांमधून तीन-चार वेगवेगळे रंग केले. हे रंग टाइल्सवर तयार केले. त्यामुळं खालीपण छान चित्र तयार झालं. त्यानं छानपैकी स्विमिंग पूल, सूर्य, आकाश (तीन रंगांचं) आणि माणूस रंगवला. जे डोक्यात आहे ते काढता आलं नाही म्हणून त्याला थोडं वाईट वाटलं. मध्येच चिडचिड झाली.

हा सगळा कार्यक्रम उरकायला २-३ तास लागले. मग ठरलं की आज एकट्यानं केलं, उद्या मित्रांना सोबत घेऊन काम करायचं. त्यासाठी जय्यत तयारी सुरू झाली. जास्त ब्रश आणायचे ठरले. रंगवायला कोण कोण येईल त्यांची यादी झाली. मग अवंतिका (१०वर्ष), स्वप्नील (८ वर्ष), अभिराम (८ वर्ष), फकीर (७ वर्ष), अन्वय (३.५ वर्ष) आणि कबीर (७ वर्ष) अशी टोळी तयार झाली.

पोरं फारच खुश आणि उत्साही पण! काय काढू काकू? पहिला प्रश्न. रंग कुठले वापरायचे? कुठे चित्रं काढायचं? एवढी जागा पुरेल का? प्रश्नांचा पाऊस.

मग प्रत्येकाला भिंतीचा एक एक भाग दिला. 'जे हवं ते काढा फक्त विचार करून काढा.' एवढंच सांगितलं. पुढचे तीन तास नुसता चिवचिवाट, रंगांची उधळण, पाणी सांडणं, रंग मागणं एवढंच काम सुरू होतं. या सगळ्यांत अन्वय अगदी लहान असल्यानं त्याला गॅलरीतला एक कोपरा आणि एक छोटा ब्रश दिला होता.

मुलांनी ब्रश घेऊन रंगवायला सुरवात केली. फुलं, गणपती, छत्री, घरं, हसरा चेहरा असं काय काय भिंतीवर साकारू लागलं आणि भिंत मस्त दिसायला लागली. अन्वय कोपऱ्यात बसून शांतपणे काम करत होता. आधी रेघोट्या काढून मग त्याचा गोल काढण्याचा प्रयत्न सुरू झाला. हळूच ब्रश बाजूला ठेवून बोटांनी रंगवण्यात मुलं गढून गेली. हिरवा, जांभळा, केशरी रंग बनवण्याचं काम सुरू होतं. मध्येच कुणीतरी तयार झालेले सगळेच्या सगळे रंग एकत्र करून त्यातून काय तयार होतंय हे बघत होतं. भिंत संपल्यावर कठडे, ग्रिल रंगवणं सुरू झालं. जी कुठली छोटी जागा सापडेल ती रंगीत होऊन जात होती.

शेवटी सगळे दमल्यामुळं एक झाड काढून प्रत्येकानं हाताचे ठसे त्यावर उमटवले. एकमेकांना कसलीही चिडवाचिडवी न करता, शांतपणे, एकत्रितपणे हे काम झालं.

रंग तयार करणं, सामूहिकरीत्या काम करण्याचा आनंद, हात रंगानं भरवायचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर झळकत होता.



**समीक्षा संध्या मिलिंद**
sameeksha77@gmail.com
7719987976




# आम्हाला 'रिच' बालपण मिळालं! - अनुजा जोशी



अनुजा जोशी या गेली २६ वर्षे आयुर्वेदिक वैद्यकीय व्यवसाय करत आहेत. महिला व बालकांचे, विशेषतः पौगंडावस्थेतील मुलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य हा त्यांचा अभ्यास व संशोधनाचा विषय आहे. अनेक नियतकालिकांत त्यांचे या विषयावरील लेखन तसेच बालकथा, ललितलेखन, कविता वगैरे साहित्य प्रकाशित झालेले आहे. त्यांच्या 'उत्सव' नावाच्या काव्यसंग्रहाला गोवा कला अकादमीचा उत्कृष्ट साहित्य पुरस्कारही मिळाला आहे.

आज मागं वळून बघताना असं वाटतंय की आम्हाला 'रिच' बालपण मिळालं! आज एकेक पायरी चढताना लक्षात येतंय की, आपलं बालपण म्हणजे आपल्या आयुष्याच्या पायाचा दगड अतिशय भक्कम, अत्यंत समृध्द होता. नानाविध पैलूंनी सजलेला, परिस्थितीच्या रंगाने जिवंत झालेला. श्रीमंत!

ते बालपण एकदम रिच असल्याची जाणीव आज क्षणोक्षणी होते. पण त्यातून एक नवाच प्रश्न एकसारखा डोकावत राहतो, तो म्हणजे आज आपल्या मुलांना असंच रिच बालपण आपण देतोय का? आपल्या मोठेपणात त्यांचं बालपण हरवून तर जात




नाहीये ना? मुलांना उद्या मिळणारं यश-अपयश आजच्या या रिचनेस वरच अवलंबून असेल असं नाही का वाटत? आई-वडील, नातेवाईकांच्या प्रेमळ पण डोळस संस्कारांचे, त्यांच्या जीवनशैलीचे, सभोवतालच्या परिस्थितीचे आणि समाजाने दिलेल्या नानाविध अनुभवांचे पैलू पडून व्यक्तिमत्त्व घडत असते, ही गोष्ट आपण पालकांनी नीट समजून घेतलीये का? की स्वत:लाच मुलांच्या आयुष्याचा कर्ता करविता समजून सगळी सूत्रं आपण आपल्या हातातूनच फिरवू पाहात आहोत? बरोबर आहे, आपणा पालकांचं म्हणजे आपल्या पिढीचं बालपण खूप मोकळं, आनंदी होतं. प्रतिकूल परिस्थिती थोड्याफार फरकानं आपण सर्वांनी अनुभवलीय. पण तरीही आपण सर्वार्थानं सुदृढपणे वाढलो. यशस्वी झालो. आज आपलं हे बालपण आठवताना आपण खूप नॉस्टॅल्जिक होतो. हळवे होतो. अगदी लेख वगैरे लिहून, वाचून रडायला लागावं इतपत! हो, हेही साहजिकच आहे. आपल्या मुलांना आपल्यासारखं बालपण मिळत नाही ही खंत या अश्रूंमागं, व्याकुळतेमागं असते. आणि नेमकी चूक तर इथंच होते असं मला वाटतं. असं हळवं होऊन आपण नकळत मुलांच्या व आपल्या आनंदाची तुलना करून त्यांचा आनंद छोटा ठरवत असतो.

खरं तर आनंदाच्या वर्तुळाची त्रिज्या प्रत्येकाची वेगळी असते. ती ज्याची त्यानं ठरवायची व ज्याचं त्यानं ते वर्तुळ रेखायचं. मग मुलांनाही ठरवू दे ना त्यांची त्रिज्या व रेखू दे ना त्यांच्या क्षमतेएवढं आनंदाचं वर्तुळ! फक्त हा आनंद त्यांनी स्वत: निर्माण केलेला असावा, ॲट अदर्स कॉस्ट नसावा एवढी काळजी मात्र आपण पालकांनी घ्यायला हवी. आपलं पालकत्व हे आणि एवढंच असावं!

आमची ताई मोठ्या इंग्लिश शाळेत जायची. आणि आम्ही दोघं लहान भावंडं प्राथमिक शाळेत. ताई शाळेतून येताना मधल्या सुट्टीत पाडलेली चिंच अर्धी खाऊन अर्धी आम्हाला आणायची. कधी अर्धाच तुरटसा आवळा, कधीकधी पाच पैशांची लिमलेटची केशरी गोळी... ताई शाळेतून येण्याची आम्ही वाटच बघत असायचो. ती लांब दिसली की धावत सुटायचो...

आज माझा मोठा मुलगा शाळेच्या पिकनिकला जातो आणि घरी आल्या आल्या डोळे बंद कर असं सांगून चिप्सचं पाकीट लहान भावाच्या हातावर ठेवतो. मग पिकनिकच्या गमती आणि आई मामा मावशीच्या पुन्हा पुन्हा ऐकलेल्या लहानपणीच्या गोष्टी यांमध्ये चिप्स फस्त होऊन जातात. 'दादा पिकनिकला, मला मात्र नाही' अशी दिवसभर लागलेली धाकट्या मुलाची भुणभुणही कुठल्या कुठं




पळून जाते. आणि माझ्या ताईच्या खिशातला आंबट गोड चिमणचारा मला इतक्या वर्षांनी पुन्हा एकदा मिळून जातो. मला बालपण मिळून जातं, माझंही आणि मुलांचंही!

परिस्थिती, संदर्भ बदललेत. वस्तू बदलल्यात. जीवनशैली बदललीय. पण भावना तीच आहे ना! तीच मजा व बालपणातला रिचनेस तर तोच आहे ना? मग आता सगळं बदललं असं म्हणत का रडावं आपण?

मी व लहान भाऊ एकदा खेळत असताना त्यानं माझ्या अंगावर पाण्यानं भरलेली कळशीच सगळी ओतली. शेणाची जमीन नुकतीच सारवलेली. पाण्यानं मातीचे पोपडे वर आले. तितक्यात बाबा शाळेतून आले. आम्ही घाबरून चिडीचूप्प. आईही कामात. थोडासा ओरडा खाल्ला, पण नंतर बाबांनी काहीच न बोलता बाहेरून शेण आणलं आणि स्वत: सारवायला सुरुवात केली. आम्ही गुपचूप उठून मदतीला लागलो. आणि त्यानंतर आम्हीच पंधरवड्याने एकदा घर सारवायला सुरुवात केली...

आज माझी मुलं माझ्या आधी घरी पोहचतात. सगळा राग घरावर काढतात की काय कोण जाणे, घर डोक्यावर घेतात. खूप दंगा... कपडे पुस्तकं खुर्च्या बिच्र्या सगळं अस्ताव्यस्त करून



टाकतात. पण मला मात्र घरात वाट बघत राहणाऱ्या मुलांकडे बघून अपराधल्यागत वाटतं! मी स्वत:चं आवरून बाकी सगळं आवरायला घेतल्यावर मुलं निमूट मदतीला येतात! मग दिवसभराच्या गप्पा मारत सगळं छान आवरून होतं, आणि घर पुन्हा ठाकठीक होऊन हसू लागतं.

तेव्हाचं शेणानं सारवलेलं घर आणि आताचं फ्लॅटमधलं घर- दोन्हीतल्या आनंदाची प्रत एकच आहे ना? शिस्त शिकवून चालत नाही आणि संस्कार ठरवून करता येत नाहीत. ते आपोआप होतात. झाले पाहिजेत. आपल्या आडात आहे ते पोहऱ्यात येणार. सकारात्मक दृष्टीच्या असंख्य झऱ्यांनी आधी आपला आड भरून जायला हवा, मग पोहऱ्यांतून तेच पाणी भरून वाहू लागेल... नक्की!

आपल्याला जे सुदृढ बालपण मिळालं त्यात आपल्या आईवडिलांचा जेवढा वाटा होता, तेवढाच महत्त्वाचा वाटा आजूबाजूच्या माणसांचा, परिस्थितीचा, पर्यायानं भोवतालच्या समाजाचा होता. आपले शेजारी हा आपल्या मुलाचा समाज व आपण शेजारच्याच्या मुलाचा समाज. शेजारच्या मुलासाठी आज आपण काही करतोय का? याचं उत्तर 'नाही' असं असेल तर शेजाऱ्यानं तरी आपल्या मुलासाठी का म्हणून काही करावं? म्हणून शेजारच्या मुलाच्याही सुदृढ बालपणाचा विचार आपण सुरू करायला हवा. म्हणजे ते वर्तुळ पुन्हा आपल्यापर्यंत येऊन पूर्ण होईल. बालपणातला 'रिचनेस' ही केवळ आपली व केवळ आपल्याच मुलाची प्रॉपर्टी नव्हे; ती एक सामाजिक संपत्ती आहे!

मुलांच्या बालपणातल्या या 'श्रीमंती'कडं आपण- पैसाकेंद्रित पिढीनं खूप डोळसपणे बघायला हवं. कौतुक आणि फाजिल लाड, हट्ट आणि आग्रह, स्वच्छंद आणि मोकाटपणा, अभिमान आणि अहंकार, काळजी आणि जपणूक, शिक्षण आणि ज्ञान, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे मार्क्स आणि गुणवत्ता! यातल्या सीमारेषा पालकांच्या मनात सुस्पष्ट असायला हव्यात, ज्या आपल्या पालकांच्या मनात होत्या. मग त्या जाणून बुजून असोत किंवा अंगभूत. आज आपल्या जगण्यातच रिचनेस उरला नाही. पैशानं गडगंज होऊन आम्ही विचारांनी दरिद्री बनलो आहोत. सगळी भौतिक सुखं पायाशी लोळण घेत असलेले आम्ही, शारीरिक कष्टाची भीती वाटणारे आम्ही, पावला-पावलावर स्वत:शी, एकमेकांशी आणि समाजाशी विसंवाद करणारे आम्ही मुलांसमोर कोणत्या आदर्शांचे धडे ठेवतोय?

आपली मुलं ही आपली प्रतिरूपं आहेत. आम्हीच असे तर ही प्रतिबिंबं वेगळी कशी होतील?

उलट विविध प्रकारच्या सामाजिक, कौटुंबिक, राजकीय, नैसर्गिक, सांस्कृतिक प्रदूषणांच्या समस्या व मोबाईल, टीव्ही, कम्प्यूटर, नेट, फास्टफूड व अनारोग्याच्या स्फोटक युगात ही मुलं खूपच हिमतीनं पावलं टाकताहेत. तर आपल्यापेक्षा निश्चितच स्मार्टनेस जास्त असणाऱ्या या मुलांकडं आपण खूप पॉझिटिव्हली बघायला हवं. आपण नको लावूया त्यांच्या दिसण्याच्याही स्पर्धा, नकोत त्या फॅन्सी ड्रेस कॉम्पिटिशन्स, निव्वळ आपली हौस भागवणाऱ्या, नको वाकवूया त्यांच्या पाठी प्रचंड दप्तरांच्या नि अपेक्षांच्या ओझ्यानं, नको जपायला त्यांना जराशी सर्दी ताप होईल म्हणून, नको घाबरून जायला त्यांचे हात-पाय मातीनं माखले म्हणून, नको येऊ देत त्यांचे सगळीकडे पहिले नंबर, नको बोलायला त्यांनी फाड्फाड् इंग्लिश... यातलं काहीच करूया नको आपण. मुलांपर्यंत परिवर्तित होईल असं 'जिवंत', असं 'श्रीमंत' जगूया फक्त. आजच्या युगातले आपण पालक खरे आई-बाप तेव्हा होऊ, जेव्हा सर्वांगानं यशस्वी झालेलं आपलं मूल आपल्याला म्हणेल की, ''तुमच्यासारखंच आम्हालाही 'रिच' बालपण मिळालं!''

**अनुजा जोशी**
dr.anupamj@gmail.com
9423308750

# पडद्यावरचे बालमजूर

- प्रकाश अनभुले

काही महिन्यांपूर्वीची गोष्ट आहे. टी.व्ही. वर एक नाचाचा कार्यक्रम सुरू होता. एक चिमुरडा मुलगा अतिशय लवचीकपणे सुंदर नाच करीत होता. त्याचा नाच झाल्यावर स्टेजवरील मान्यवरांनी त्याला प्रश्न केला की तुला नाचाची प्रेरणा कशी मिळाली आणि इथपर्यंतचा प्रवास कसा झाला. त्यावेळी त्या चिमुरड्याने जे उत्तर दिले ते ऐकून स्टेजवर बसलेल्या जरा संवेदनशील मंडळींनी डोक्यालाच हात लावला. त्याने सांगितले जोवर मी दिवसातून दोन-दोन तासांची तीन वेळा प्रॅक्टिस करीत नाही तोवर माझी आई मला जेवायला देत नाही. त्यावर त्याच्या आईची प्रतिक्रिया तर अजून असंवेदनशील होती. ती म्हणाली, 'लहान वयातच अंग वळवणे शक्य होते आणि तरच मुले पुढे जाऊन चांगले डान्सर बनतील.' उपस्थित मान्यवरांपैकी एकाने सांगितले की ते स्वतः २१ व्या वर्षी नृत्य शिकले आणि आज एक उत्तम डान्स-लेजंड आहेत. त्यावर आईचे उत्तर आले की तो तुमचा काळ वेगळा होता(?). मग अजून एक प्रश्न आला की तो शाळेत जातो का? यावर उत्तर आले की शाळेने देखील पुढाकार घेऊन त्याला काही महिन्यांची सुट्टी जाहीर करून टाकली होती. या दरम्यान समोर असलेले प्रेक्षक टाळ्या वाजवत होते तर मान्यवर शांत आणि थोडे सुन्न होते.

'ज्या कामामुळे मुलांच्या शिक्षण-हक्कामध्ये अडथळा येतो किंवा मुलांच्या सामाजिक, शारीरिक, मानसिक अथवा नैतिक विकासात बाधा येते असे कोणतेही काम म्हणजे बालमजुरी', असे बाल-हक्काच्या मसुद्यात नमूद केले आहे. मग अशा प्रकारच्या स्पर्धा भरवणे आणि अशा प्रकारची तयारी करून घेणे ही पण बालमजुरीच नाही का? फरक फक्त हा की ही बालमजुरी उच्चभ्रू कुटुंबातील सुजाण(?) पालकांकडून घडते व ती पोटापाण्यासाठी नसून पालकांच्या प्रतिष्ठेसाठी असते. हल्ली याचे अनुकरण अगदी सामान्य कुटुंबातील पालकदेखील करू लागले आहेत. आपली आर्थिक परिस्थिती नसतानादेखील ते या विलोभनीय स्वप्नांकडे धावत आहेत. अशा स्पर्धांमध्ये भाग घेण्याच्या नादात ही चिमुरडी बालपण हरवून बसतात आणि अपयश आलेच तर धड शिक्षणही घेऊ शकत नाहीत.

आपली स्वप्ने आपल्या मुलांवर लादून आपण काय मिळवतो? दिवसातील सहा तास नाच, परत शाळा, एवढे ओझे तेही पालकांच्या स्वप्नपूर्तीसाठी? यातून आपण मुलांना स्पर्धा म्हणजे त्यात नेहमीच जिंकायचे असते असे संस्कार देऊन जातो आणि मूल तसेच घडत जाते. पुढे त्याच्या भविष्यात याचे दुष्परिणाम ते नक्कीच भोगत असणार. शिवाय अशा स्पर्धेत हार पत्करावी लागली तर कायम त्याची सल त्याच्या मनावर बिंबविली जाते. काही वेळा तर हे नीट जमत नाही म्हणून अजून वेगळ्या स्टेजसाठी पुन्हा तशीच कसरत सुरू केली जाते. एका पालकांना आपल्या मुलाला बाल-कीर्तनकार बनवायचे होते. म्हणून बालवाडीतल्या मुलाला अवघड भजने शिकवण्याचा त्यांचा अट्टाहास होता. मुलगा दुसरीत गेल्यावर हे पालक रस्त्यात भेटले. मी विचारले, ''कसे काय चालले आहे गाणे?'' त्यावर ते म्हणाले, ''कराटे खेळतो. ब्राऊन बेल्ट मिळाला अमुक तमुक ठिकाणी. आता ब्लॅक बेल्टची तयारी करतोय.''


जे वय आनंदाचे, मुक्त खेळाचे आणि बहुविध विकासाचे आहे तेथे आपण आपल्याच लेकरांना अशा स्पर्धेत आणि एक प्रकारच्या मजुरीला जुंपून देतो. लहान वयात अशा कसरती करून किती मुले पुढे जाऊन या क्षेत्रात यशस्वी होताना दिसतात? एक आवड म्हणून कला जोपासणे यात काही वावगे नाही पण यासाठी बालकाला त्याचे बालपण आणि शिक्षण यांपासून वंचित करून कसे चालेल?

आज टी.व्ही. वर निम्म्याहून जास्त जाहिरातीत काम करणारी मुले ही बालमजूरच आहेत. ती हसरी नाचरी दिसतात म्हणून त्या संदर्भात हा शब्द आपल्या डोक्यात येत नाही. पण जरा विचार करा, याला बालमजुरी का म्हणू नये?

आपण खरेच या चिमुरड्यांना त्यांचे बालपण आणि जगण्याचे स्वातंत्र्य देतो का? की ती अखंड पालकांच्या पारतंत्र्यातच असतात? वर दिलेली उदाहरणे ही फक्त सहज नजरेस पडलेली आहेत. पण अशी अनेक चित्रे आपल्या सभोवतालच्या जगात आहेत. त्यांना कुठलाच कॅमेरा पाहत नाही आणि कुणी त्यांच्याबद्दल बोलतही नाही. आपण मुलांना घडवतोय आणि त्यांना ते आवडतेय अशी पालकांची एक भ्रामक कल्पना बनून गेली आहे.

खरे तर मूल जन्माला येण्याअगोदरच आपण त्याच्या बालपणाचा कसा गळा घोटायचा याची नकळत तयारी करीत असतो. आपल्या अपेक्षा आणि त्यासाठी करावी लागणारी तयारी याचा आपण एक कार्यक्रम ठरवून ठेवतो. मग बालपण मुलांना मिळणार कसे आणि ज्याला बालपण म्हणजे काय याची जाणीव नाही त्याला ते हरवल्याचे दुःख तरी काय असणार?

(पान ६ वरून) पण त्याचे दूरगामी परिणाम मात्र (पान १३ वर)



# अरे, प्रकल्प प्रकल्प...

- सुबोध केंभावी



सुबोध केंभावी हे प्रयोगशील,पर्यायी शिक्षणपद्धतींचे अभ्यासक आहेत. अशा पद्धती प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये रुजाव्यात यासाठी ते शिक्षकांना मदत व मार्गदर्शन करतात. त्यांना गणित, विज्ञान व भाषा हे विषय शिकायला व शिकवायला आवडतात. शिक्षण क्षेत्रातील संस्था, व्यक्तींचे एक कार्यक्षम नेटवर्क महाराष्ट्रात विकसित व्हावे यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

विद्यार्थ्यांनी प्रकल्प करणे व त्याचे सादरीकरण करणे ही काही नवीन गोष्ट राहिलेली नाही. बहुतेक शाळांमधून दरवर्षी अनेक प्रकल्प केले जातातच. पण असे बहुतेक प्रकल्प कशा प्रकारे केले जातात? त्यात विद्यार्थ्यांचा सहभाग किती असतो? शिक्षकांची किंवा पालकांची मदत किती घेतली जाते? प्रकल्पाचे सादरीकरण शेवटी विद्यार्थी करत असले तरी बहुतेक वेळा ‘पडद्यामागचे खरे कलाकार’ हे पालक किंवा शिक्षकच असतात.

शाळेतील मुख्य काम हे पाठ्यपुस्तक शिकवून संपवणे (!) व परीक्षा घेणे हे असते. वर्षातून एकदा-दोनदा होणारे प्रकल्प बहुतेक शिक्षकांसाठी दुय्यम महत्त्वाचे असतात. वर्षातून एकदा सहल काढायची, दरवर्षी क्रीडास्पर्धा घ्यायच्या तसाच प्रत्येक विद्यार्थ्याने वर्षातून एखादा प्रकल्प करायचा!

हे मान्य करायला हवे की या चाकोरीनुसार केलेल्या प्रकल्पाच्या निमित्तानेदेखील काही चांगल्या गोष्टी घडतात, काहीच चांगले घडत नाही असे नाही. काही ठरावीक माहिती पाठ करून त्याचे नीट निवेदन करणे याचा सराव मुलांकडून होतो. हस्तकला- चित्रकलेशी संबंधित काही काम करता येते. वर्गात बसून शिक्षकांचे बोलणे ऐकणे या रोजच्या (बहुधा कंटाळवाण्या) अनुभवापेक्षा एक वेगळा अनुभव मिळतो. वर्गाबाहेर, गटात काम करायला मिळते आणि बहुतेक मुलांना ते आवडतेच.

मात्र, हे लक्षात घेतले पाहिजे की बहुसंख्य वेळा प्रकल्प या तंत्राची कुवत पूर्णपणे वापरली जात नाही. शाळेत केलेल्या प्रकल्पामुळे नेमके काय व्हायला पाहिजे, ते समजून घेऊया.

अजून पाच दहा वर्षांनंतरचे जग किती झपाट्याने बदलणारे असेल? त्यात ज्ञानाचे, माहितीचे प्रमाण किती असेल? थोडासा विचार केला तरी लक्षात येईल की अशा जगात वेगवेगळ्या पद्धतीने शिकणे जमायलाच पाहिजे. नाहीतर माणूस गोंधळून जाईल. आनंदाने जगू शकणार नाही. गेल्या दहा वर्षांतच अशी परिस्थिती आसपास आकार घेताना दिसते आहे. पुढच्या पिढीला तर ही गरज अधिकच जाणवणार आहे.

वाचनालयाचा किंवा वस्तु-संग्रहालयाचा वापर करून शिकता येणे, लघुपट पाहणे, जाणकार व्यक्तींशी चर्चा करणे, एखाद्याला काम करत असताना बघून शिकणे, स्वतः प्रयोग करून पाहणे, गटात काम करत करत एकमेकांना मदत करत शिकणे अशा अनेक प्रकारे शिकता आले पाहिजे.

ठरावीक माहिती पाठ करून त्याचे निवेदन केले जाते अशा प्रकल्पात हे असे शिकणे होत नाही. प्रकल्प नीट केला तर शिकण्याचे हे सगळे प्रकार मुले अनुभवू शकतील. मग पुढील पाच-दहा वर्षांत मुले शाळेबाहेरच्या जगण्यातही या प्रकारे शिकू लागतील. जर असे खरेच घडले तर हा मुलांच्या व्यक्तिमत्त्वातील एक मोठा सकारात्मक बदल असेल. मात्र यासाठी प्रकल्प या तंत्राची पूर्ण ताकद वापरून तो नीट केला गेला पाहिजे.

**प्रकल्प नीट करायला पाहिजे म्हणजे नेमके काय... ?**

प्रकल्पाचा आधार घेऊन होणारे अध्ययन (Project based learning - PBL) या विषयावर मुंबईत काही कार्यशाळा झाल्या. मुंबईतील होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राने या कार्यशाळा आयोजित केल्या होत्या. त्यात मला सहभाग घेता आला, शिकायला मिळाले व त्या आधारे थोडे कामही करता आले.

एकूण तीन कार्यशाळा झाल्या. दर कार्यशाळेवर आधारित काम पुढील कार्यशाळेपूर्वी काही शाळांमध्ये केले गेले. मुंबईच्या गोरेगाव उपनगरामधील अ. भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल ही त्यातील एक शाळा होती. या शाळेत झालेले प्रकल्पाधारित अध्ययनाचे (PBL) काम समजून घेऊया.

१. इयत्ता आठवीतील २० विद्यार्थ्यांबरोबर असा एक प्रकल्प करायचे ठरले. या २० विद्यार्थ्यांचे चार गट बनवले. शिक्षकांनी वर्गात शिकवले नाही तरीही प्रकल्पातून मुले नेमके कायकाय शिकतील हे विषयवार ठरवले गेले. त्यांपैकी चार विषयांचा तपशील पहा-

विज्ञान- ऊर्जेचे स्रोत, विद्युतप्रवाह, विद्युतचुंबक

गणित- चलन - समचलन, व्यस्तचलन

मराठी - भाषाशैली व अभिव्यक्तीचा विकास

इंग्रजी- इंटरनेटवरून किंवा इंग्लिश पुस्तकातून माहिती समजून घेता येणे.

२. आता हा प्रकल्प एका समस्येभोवती गुंफायचा होता. ही समस्या व तिची मांडणी मुलांसाठी पुरेशी प्रेरक असायला हवी होती. याबाबत पुढील नोंद वाचा-

शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती देवलबाई यांनी PBL साठी निवडलेल्या २० विद्यार्थ्यांना प्रथम त्यांच्या घराचे विजेचे बिल किती येते हे विचारले. विद्यार्थ्यांनी उत्तरे दिल्यानंतर शाळेचे विजेचे बिल अंदाजे किती येत असेल हे विचारले. विद्यार्थ्यांनी १०,०००/–, ८०००/– अशी उत्तरे दिल्यानंतर मुख्याध्यापकांनी बिलाची रक्कम २०,०००/– सांगितली व ही वीजबिलाची रक्कम आपल्याला कमी करता येईल का असे विचारले. विद्यार्थ्यांनी अनावश्यक वेळी विजेचा वापर आपण टाळू शकतो असे सुचविले. याशिवाय काही विद्यार्थ्यांनी सोलर पॅनल, पवनचक्की यातून वीजनिर्मिती करता येऊ शकते व त्याचा उपयोग करण्याचा उपाय सुचविला. कचऱ्यापासून वीजनिर्मिती करता येऊ शकेल का? असा प्रश्न मुख्याध्यापिकांनी उपस्थित केला व प्रत्येकाला वीजनिर्मिती संदर्भात काय सुचते ते स्वतंत्रपणे लिहून आणावयास सांगितले.

अशा चर्चांमधून समस्येची मांडणी विकसित होत गेली. शाळेतील एक तरी ट्यूबलाईट किंवा पंखा चालवू शकू इतकी वीज आपण नेमकी कशी तयार करू शकू असा विचार विद्यार्थी करू लागले.

या प्रकल्पाचे वेगळेपण लक्षात घ्या. प्रकल्पाच्या सादरीकरणाच्या दिवशी एक लहानसा दिवा पेटवून दाखवणारे प्रकल्प अनेकदा होतच असतात. इथे शाळेतील एक ट्यूबलाईट किंवा पंखा चालवायचा आहे आणि तोदेखील फक्त प्रकल्पाच्या एका दिवसापुरता नव्हे तर वर्षभर! रोज ही वीजनिर्मिती होत राहील अशी व्यवस्था उभी करायची आहे. सरकारी वीज नीट मिळत नाही किंवा अजिबात मिळत नाही अशा कोणत्याही गावात लोकांना जाणवणारी खरीखुरी समस्या आहे ही.


३. विद्युतशास्त्रातील काही मूलभूत संकल्पना आठवीच्या विज्ञानात आहेत. मात्र, तेवढी माहिती वरील समस्या सोडवायला पुरेशी नाही. मग बाकीची सगळी माहिती व कौशल्ये मुले कुठून मिळवतील? हे काम एखाद्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरने करायचे आहे, ते आठवीतील मुले करू शकतील का? हे सर्व प्रश्न आठवीतील मुलांच्या स्वयंअध्ययनाच्या कुवतीशी निगडित आहेत. त्याबाबत शाळेत काय काम झाले ते पाहूया.

शिक्षकांनी विद्युतशास्त्रासंबंधी काही निवडक पुस्तके मुलांना दाखवली व अशीच इतर पुस्तके वाचनालयातून निवडायला सांगितले. एकाच पुस्तकात सगळी माहिती मिळणार नाही, वेगवेगळ्या पुस्तकांमधून माहिती निवडून ती एकत्र करावी लागेल असेही सांगितले. पुस्तके वाचण्याखेरीज मुले या क्षेत्रातील जाणकारांशी चर्चाही करू शकणार होती.

जाणकारांच्या मदतीबाबत एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा. समजा सोलर पॅनेल लावायचे आहे. जाणकार व्यक्तींची मदत घेतली तर असेही होऊ शकेल की मुलांसाठी फारसे काम उरणारच नाही. बहुतेक सर्व काम ती जाणकार व्यक्तीच करेल व मुले केवळ या व्यक्तीने दिलेली माहिती पाठ करून सांगतील.

हे टाळण्यासाठी जाणकार व्यक्तींशी केवळ चर्चाच करता येईल, अशा व्यक्ती शाळेत येऊन प्रत्यक्षात काहीही काम करणार नाहीत असे मुलांना सांगितले होते. त्यामुळे जरी जाणकार व्यक्तीकडून काही माहिती मिळाली तरी त्याचे शाळेतील नेमके उपयोजन मुलांनाच करायचे होते. उदा. किती क्षेत्रफळाचे सोलर पॅनेल लावले तर किती वीज तयार होईल हे चर्चेतून कदाचित समजेल पण आपल्या शाळेतील नेमकी कुठली जागा वापरावी, किती जागा वापरावी, त्यामुळे किती पंखे किंवा दिवे चालवता येतील हे सगळे मुलांनाच शोधून काढायचे होते. हे करताना विद्युतप्रवाह, विद्युतशक्ती, सौरऊर्जेचे विजेत रूपांतरण अशा संकल्पनांचे ज्ञान वापरावे लागणार होते. संबंधित गणितही करावे लागणार होते. याशिवाय यंत्रणेचा नेमका खर्च ठरवणे, वर्षभर त्याची देखभाल होईल अशी व्यवस्था उभी करणे अशी कामेदेखील विद्यार्थ्यांनीच करायची होती.

स्वयंअध्ययनाच्या प्राथमिक प्रयत्नानंतर विद्यार्थ्यांच्या एका गटाने केलेली सूचना पहा.



प्रति:
कार्यवाह,
शिक्षण मंडळ गोरेगाव
विषय - शाळेची वीज वाचवण्यासाठी काही उपाय.
आपल्या शाळेची वीज वाचवण्यासाठी आपण पवनचक्की उपयोग करू शकतो. पवनचक्की आपण आपल्या शाळेच्या टेरेसवर लावू शकतो. त्या पवनचक्क्या २० फूट उंचीच्या लावाव्या. एका पवनचक्कीची जागा फक्त १०×१० फुटाची जागा लागते. त्याप्रमाणे आपल्या टेरेसवर २० पवनचक्क्या लागतील म्हणून आपल्या शाळेला बाहेरची वीज घेण्याची गरज भासणार नाही. टेरेसचा उपयोग बॉटनिकल गार्डन बनवण्यापेक्षा ती जागा पवनचक्क्यांसाठी उपयोग करावा. बॉटनिकल गार्डनमुळे आपल्या शाळेची छत कुजू शकते.

ही सूचना पुरेशी नेमकी व तपशीलवार नसली तरी मुलांच्या आकलनाच्या मूल्यमापनाचे एक साधन म्हणून निश्चितच उपयोगी आहे.

उंची २० फूटच कशी ठरवली? २० पवनचक्क्यांमधून शाळेसाठी लागणारी सर्व वीज निर्माण होईल हे कसे ठरवले? अशा प्रश्नांमधून मुलांच्या शिकण्याला दिशा देता येऊ शकते.

या चित्रातील तपशीलसुद्धा लक्षात घ्या. टेरेसवर बोटॅनिकल गार्डन का करू नये हे लिहिलेही आहे व चित्रातूनही दाखवले आहे. पवनचक्कीखाली दाखवलेली चौकोनी पेटी पाहा. त्या पेटीत गुंडाळलेल्या वायरसारखे चित्र आहे. वायर गुंडाळलेली दाखवली आहे, म्हणजे वीजनिर्मितीमध्ये कॉईलची कुठेतरी गरज आहे हे अर्धवट समजलेले असू शकेल किंवा नुसतेच पुस्तकात वाचून खरे मानलेले असेल. या चित्राबाबत मुलांशी तपशीलवार पण त्यांच्या कलाने चर्चा करावी लागेल. या पेटीत नेमके काय घडत असेल यावरील चर्चेतून विद्युत-चुंबकत्व व त्यातून होऊ शकणारी वीजनिर्मिती याबाबत मुले नेमके काय शिकत आहेत हे समजू शकेल. शिवाय केवळ चर्चा पुरेशी नाही. एकतरी बल्ब, पंखा वगैरे वर्षभर चालवता येईल अशी कार्यक्षम पवनचक्की प्रत्यक्षात उभी केली तरच वेगळाच लेख लिहावा लागेल. एका गटाने विद्युतघटांची रचना समजून घेऊन त्यातून वरील समस्या सोडवायचा प्रयत्न केला. दुसऱ्या एका गटाने शाळेत असलेला एक मोडका जनरेटर शोधून काढला. हाताने फिरवायचा हा जनरेटर त्यांनी काही जणांशी चर्चा करून व बरीच खटपट करून चालू केला आणि एक लहानसा दिवा (एलईडी) पेटवून दाखवला. आता हेच काम मोठ्या प्रमाणावर कसे करता येईल याचा ते विचार करू लागले.

एका गटाने अभ्यास करून विद्युत जनित्राची आकृती काढली. त्यात वापरण्यात येणाऱ्या चुंबकाचा खर्च फार होता व ते चुंबक उपलब्ध होणे कठीण होते म्हणून मुलांनी (शिक्षकांच्या परवानगीने) प्रयोगशाळेतील नादुरुस्त विद्युत जनित्र पूर्ववत करण्यास सुरुवात केली. विद्युत जनित्र पूर्ण उघडले, त्यातील नालाकृती चुंबक काढून त्या चुंबकाची क्षमता किती आहे हे तपासून पाहिले. इ. दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन घेऊन जनित्रातील उणिवा माहीत करून घेतल्या व जनित्र चालू स्थितीत आणण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात त्यांना एलईडी बल्ब जनित्राद्वारे मिणमिणता पेटवता आला.




त्या शिकण्याचा उपयोग झाला असे मानले जाणार आहे.

या चित्रासोबतच्या वर्णनात मुलांनी निवडलेले शब्द व वाक्यरचनेचेही नीट निरीक्षण करायला हवे. मुंबईच्या मराठी माध्यमाच्या शाळेमधील प्राथमिक शिक्षणाच्या शेवटच्या वर्गातील ही मुले आहेत. या गटातील बहुतेक मुले ही कनिष्ठ-मध्यमवर्गीय किंवा त्याहून गरीब घरांमधील आहेत. स्वतःच्या कल्पना व विचार स्वतःच्या शब्दात कळवण्याचा प्रामाणिक प्रयत्न दिसतो आहे पण यासाठी आवश्यक ती किमान लेखनकौशल्ये मुले शिकली आहेत का यावर विचार झाला पाहिजे.

सर्वच गटांचे काम तपशीलवार कळवायचे झाले तर एक

या सर्व गटांच्या कामात समन्वय राखणे व कामाच्या नोंदी ठेवणे ही कामे अ. भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूलमधील भारती सावंत या शिक्षिका करत होत्या. तपशीलवार ठेवलेल्या लेखी नोंदी व काही चित्रमुद्रणे या कामामुळेच सध्या उपलब्ध आहेत. त्यातील काही नोंदी या लेखातही वापरल्या आहेत.

असा प्रकल्प करताना शाळेतून व्यवस्थापकीय मदत मिळावी लागते व ती नियमितपणे मिळत राहावी लागते. शाळेच्या एका सत्रभर चालू असलेल्या या प्रकल्पाच्या कामात अ. भि. गोरेगावकर शाळेच्या व्यवस्थापकीय मंडळाकडून व खासकरून सहकार्यवाह शलाका देशमुखांकडून अशी मदत मिळाली म्हणूनच हा प्रकल्प करता आला.

प्रकल्पाच्या शेवटी एकाही गटाने वीजनिर्मितीची व्यवस्था उभी केली नाही. मात्र, काय काय काम केले व त्यातून काय समजले हे मुलांनी सांगितले. अर्थात वीजनिर्मिती हा मूळ हेतू नव्हताच. मुले या प्रकल्पाच्या निमित्ताने अभ्यासक्रमातील काही निवडक भाग स्वतःहून शिकतात का याचा शोध घेणे हा खरा उद्देश होता.

मुलांचे स्वयंअध्ययन नीट विकसित व्हावे यासाठी मदत करणे व प्रकल्पाच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी समजून घेऊन उपाय सुचवणे ही कामे मी एक सल्लागार म्हणून करत होतो.

माझे मत असे आहे की आम्हाला अपेक्षित होती ती सर्व अध्ययन उद्दिष्टे प्रकल्पाच्या अखेरीस पूर्ण झाली नाहीत. अर्धवट यश मिळाले असे म्हणता येईल. या यशापयशाची कारणे नीट समजून घेतली पाहिजेत. इथे काही महत्त्वाच्या कारणांची थोडक्यात नोंद केली आहे.

१. होमी भाभा विज्ञान शिक्षण संस्थेत (HBCSE) झालेल्या कार्यशाळांचा खूपच फायदा झाला. डॉ. चित्रा नटराजन व सौरव शोम या तज्ज्ञांकडून PBLचे तात्त्विक पैलू, मुलांच्या शिकण्याचे मूल्यमापन, प्रकल्पाचे नियोजन याबाबत शिकायला तर मिळालेच पण पूर्ण प्रकल्पादरम्यानही वेळोवेळी त्यांच्या मदतीचा व मार्गदर्शनाचा लाभ झाला.

२. प्रकल्पातून होऊ शकणाऱ्या स्वयंअध्ययनासाठी वाचनकौशल्य, अभ्यासकौशल्य इत्यादींची गरज असते. प्रकल्पापूर्वी ही कौशल्ये वर्गामध्ये मुलांकडून फारशी वापरली जात नव्हती आणि केवळ काही महिने चाललेल्या या प्रकल्पात त्यांची ही कौशल्ये पुरेशी विकसित करता आली नाहीत.

३. एका प्रकल्पात अनेक विषयांमधील निवडक विषयघटकांचा मेळ घालणे (subject integration) अधिक चांगल्याप्रकारे जमायला हवे होते. केवळ काही कार्यशाळांमुळे असा मेळ घालणे शिकता येणार नाही. परत परत प्रयत्न करून शिकायला हवेच पण असे काम खरोखरच पारंपरिक शाळांच्या चौकटीत जमेल का यावरच विचारमंथन झाले पाहिजे. Subject integration चे धोरण आपल्या शाळांच्या अध्यापनात मूलभूत असे बदल घडवेल. आपण तयार आहोत का अशा बदलांना याचे प्रामाणिक उत्तर दिले पाहिजे.

४. वेगवगळ्या पद्धतीने शिकता येते हे केवळ शाळेतच दिसायला पाहिजे असे नाही. घरातही पालक स्वतः अशाप्रकारे शिकताना दिसायला हवेत. उदा. घरात किंवा घराजवळ झाडे वाढवायचे वेगवेगळे प्रयोग होताना दिसले पाहिजेत. रोजच्या भाज्या अधिक चवदार व पौष्टिक बनवायला पालक इतरांचा स्वयंपाक बघून व स्वतः प्रयोग करून शिकत असतात हे मुलांना दिसले पाहिजे. असे प्रयोग एखाद्या घरी होत असतील तिथेही मुलांना (खास करून मुलग्यांना) त्यात सहभागी केले जाताना दिसत नाही.

आई-वडील केवळ एका नोकरीला चिकटून आहेत, नवीन काही शिकत नाहीत व रोज संध्याकाळी टीव्हीवरच्या मालिका बघत असतात असे दिसले तर मुलांनाही वेगवगळ्या पद्धतींनी शिकावेसे वाटणार नाही. पुस्तके वाचून, लघुपट बघून, जाणकार व्यक्तींच्या मुलाखती ऐकून आपल्याला काय जाणवले, समजले याची चर्चा घरामध्ये होत राहिली पाहिजे. घरच्या दुरुस्तीच्या, स्वच्छतेच्या किंवा इतर कामांत मुलांचा सहभाग असला पाहिजे. पालकांनी शाळेतला एखादा प्रकल्प पूर्ण करायला तात्पुरती मदत करण्यापेक्षा वेगळ्या प्रकारची कायमस्वरूपी अशी ही जबाबदारी आहे.

५. या प्रकल्पात मुले गटात काम करत शिकत होती. अनेक विषयघटक शिक्षक थेट शिकवणार नव्हते. अशा वेळी ज्ञानरचनावादी पद्धतीची समज-उमज महत्त्वाची ठरते. त्यातील काही संकल्पना नीट उमजलेल्या असाव्या लागतात. उदा. एखादा विषय थेट न शिकवता शिक्षकाने सुलभक (facilitator) व्हायचे म्हणजे नेमके काय करायचे? मुलांच्या शिकण्याच्या संदर्भात परांची (scaffolding) ही संकल्पना नेमक्या कोणत्या अर्थाने वापरली जाते?

हे थोडक्यात सांगायचा प्रयत्न केला तर असे म्हणता येईल की इमारतीचे बांधकाम, रंगकाम करताना चढायला सोपे जावे म्हणून बांबू किंवा लोखंडी पाइपांची परांची बांधली जाते त्या अर्थछटेशी संबंधित अशी ही संकल्पना आहे. शिक्षकाने मुलांसाठी शिकण्याचे काही अनुभव नीट क्रमाने रचले पाहिजेत. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की अशा अनुभवांशिवायही मुले स्वतःहून किंवा गटकामातून एका पातळीपर्यंत शिकू शकतातच. मात्र, अशा या अनुभवांचा फायदा घेऊन मुले त्या पातळीच्याही पुढे जाऊन शिकू शकतात. या नीट क्रमाने रचलेल्या अध्ययन अनुभवांना परांची (scaffolding) म्हणता येईल.

या प्रकल्पाच्या संदर्भात बोलायचे तर आम्ही हे scaffolding खूपच कमी प्रमाणात पुरवले असे मला वाटते. यामुळेही मुले स्वयंअध्ययनाने जितकी पुढे जाऊ शकली असती तितकी गेली नाहीत. यावरून हे लक्षात येईल की असे scaffolding पुरेशा प्रमाणात दिले गेले आहे हे कसे समजते हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. यावर एक वेगळा विस्तृत लेख लिहिता येईल.

असे प्रकल्प अनेक शाळांमधून व्हायचे असतील तर या विषयावर मोकळेपणाने चर्चा झाली पाहिजे. तुमची मते, सूचना व शंका कळल्या तर अशी चर्चा घडून येईल व त्यामुळे शाळांमध्ये प्रकल्प अधिक चांगल्या प्रकारे होऊ लागतील अशी आशा आहे.

**सुबोध केंभावी**
subkem@gmail.com
9819144898


# चार भिंतींत न मावणारी मुले

- विठ्ठल कदम



विठ्ठल कदम हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुणकेरी, सावंतवाडी येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. २००८ मध्ये त्यांना महाराष्ट्र शासनाने आदर्श शिक्षक राज्य पुरस्काराने सन्मानित केले. श्री. कदम अनेक सांस्कृतिक मंच व चर्चा मंडळांचे अध्यक्ष आहेत तसेच दोन मासिकांचे संपादकदेखील आहेत. त्यांनी दोन काव्यसंग्रह, एक कादंबरी व व एका बालकथासंग्रहाचे लेखन केले आहे.

त्या दिवशी गावच्या पारावर दोन आजोबांच्या गप्पा खूपच रंगात आल्या होत्या. अवती भवती अंधार पडत आल्याचे भानही त्या म्हाताऱ्या जिवांना राहिले नव्हते. असा कसला विषय होता त्या दोघांच्या गप्पांचा? अहो ते आज काही आपल्या पेन्शनबद्दल बोलत नव्हते किंवा घरातल्या मुला-सुनेच्या जाचाबद्दल बोलत नव्हते. ते बोलत होते आपल्या नातवंडांच्या कमालीच्या हुशारीबद्दल. त्यांच्या बालमनातील अजब प्रश्नांबद्दल. त्या दोघांमधले एक आजोबा तर चक्क म्हणाले, ''अरे बाबा, आता आपण फक्त वयाने मोठे म्हणून आजोबा उरलोय. खरं सांगू का



तुला? आज माझ्या चार वर्षांच्या नातवाकडून मला खूप काही शिकायला मिळतंय बुवा. अरे आपल्या बालपणात तर आपण शेणामातीच्या गोळ्यासारखे होतो म्हणे. आणि तुला माहीतच आहे आपल्या पोरांना तर आपण मारून मुटकून शिकवलीत बघ. पण आजची ही चिमुरडी महाभारतातल्या त्या अभिमन्यूसारखी आईच्या पोटातूनच सर्व धडे गिरवून आलीत असं म्हणायला काहीच हरकत नाही. या पोरांच्या मनातील एका एका प्रश्नाचं निरसन करताना नाकी नऊ येतात बघ! कधी कधी वाटतं त्यांच्या कल्पनांच्या राज्यातच आपण अखंड रमून जावं. ''

मोकळ्या हवेत विरंगुळा म्हणून सायंकाळच्या वेळेला त्याच पारावर दुसऱ्या बाजूला मीही बसलो होतो. त्या दोन वयोवृद्ध आजोबांचे संभाषण मी कान टवकारूनच ऐकत होतो. त्यांच्या गप्पांमध्ये रंगलेल्या विषयात सहभाग घ्यावा असे मलाही मनापासून वाटत होते. पण त्या अनुभवसिद्ध व्यक्तींच्या संवादात मला खटकण्यासारखे असे काहीच वाटले नाही. मात्र त्यांच्या बोलण्यात एक वाक्य बऱ्याच वेळा येऊन गेले होते. ते म्हणजे ''अणुबॉम्बसारख्या या पोरांना शाळेतले मास्तर कसे बुवा सांभाळत असतील? आणि या चिमुरड्यांच्या मनातील नवलाईला ते कसा आकार देत असतील? आणि खरंच असं घडत असेल तर मानलंच पाहिजे बुवा. गुरू म्हणून त्यांना वंदन करायलाच हवं.'' खरे तर ते दोन म्हातारे क्षणभर मलाच रोखून बोलत असावेत असे वाटून गेले. पण ते असे कशाला करतील? आणि खरे म्हणजे मी शिक्षक आहे हे त्यांना माहीतसुद्धा नसावे. कारण ना ते माझ्या ओळखीचे ना मी त्यांच्या. चला, हा मुद्दा महत्त्वाचा नाही. ते आजोबा जे काही आज या पारावर बोलत होते, त्यात खरे किती आणि खोटे किती यावर मीच माझ्याशी संवाद सुरू केला.

माझ्या मास्तरकीची २६ वर्षे भराभर वावटळीने झाडावरची बावलेली पाने भराभर खाली पडावीत तशी एकेक करत माझ्यासमोर येऊन उभी राहिली होती. मी मास्तरकी पार पाडलेल्या शाळांतील मुले, त्यांचे आईवडील सगळे सगळेच माझ्या मनाच्या अंगणात येऊन ठाण मांडून बसले होते. अगदी समोर येऊनच उभी राहिली होती सगळी पात्रे. मला सगळ्यांनाच ओळखता येत नव्हते पण ती सगळी पात्रे मला ओळखत होती. माझ्या स्मृतिपटलावरून फळ्यावरच्या खडूची अक्षरे पुसली जावीत तशी ही पात्रे मी कधीचाच पुसून मोकळा झालो होतो. पण आपला भूतकाळ आपण कितीही विसरण्याचा प्रयत्न केला तरी तो कधी ना कधी कुठलेही रूप घेऊन आपल्यासमोर उभा राहतोच बऱ्या वाईट अर्थाने. माझ्या वर्गातील

मुलांना मीच शिकवलेले हे विधान! आणि या विधानाचा आज मला प्रत्यक्ष प्रत्यय येत होता. पण काही का असेना माझ्यातून तुटलेला एक संवाद माझे स्वप्न मला पुन्हा जोडून देत होता.

आज माझ्या डोळ्यांसमोर गेल्या २६ वर्षांतील अशी पोरे उभी होती ज्यांना मी अखंड चार भिंतीच्या कोंडवाड्यात डांबून मोठे बनविण्याचा प्रयत्न करीत होतो. एका एका इयत्तेतून दुसऱ्या इयत्तेत प्रवेश देताना माझ्या गुणवत्तेच्या परिमाणात न बसलेली जी पोरं माझ्या हातून निसटली होती त्यांचे पुढे काय झाले? याचा शोध आणि बोध मी कधीच घेतला नव्हता. पुस्तकी प्रश्नातच भाराभर गुण मिळवणारी पोरे मला माझी वाटली होती. त्यांच्यातच मी माझ्या शाळेची गुणवत्ता, आदर्श पुरस्कार शोधत गेलो. अशा पोरांच्याच वाट्याला मी मान-सन्मान, कौतुके आणि प्रशस्तीपत्रे बहाल केली. मात्र ज्या पोरांचे मन अशा गोष्टींत कधी रमले नाही, ज्यांना चार भिंतींची माझी शाळा कधीच पसंत नव्हती, ज्यांना माझी चौकट कधीच बांधू शकली नव्हती अशा पोरांना मी टाकाऊ, निरुपयोगी म्हणत विसरत चाललो होतो. चार भिंतींत न रमणाऱ्या पोरांना दुसरे नेमके काय हवे होते? माझ्या हातून निसटलेल्या पोरांचे पुढे काय झाले हे शोधणे म्हणजे मी माझी मास्तरकी समजत नव्हतो. आणि हा माझ्या हातून घडलेला भयानक गुन्हा आज मला मान्य आहे.

कालच मला माझा एक नावडता विद्यार्थी पानबाजारात भेटला. ज्याला मी पाटीवर घातलेले गणित कधीच सोडवता आले नव्हते. त्याचा गणित विषय कच्चा म्हणून त्याच्या भविष्याबद्दल मी कधीच आशावादी बोललो नव्हतो. तोच विद्यार्थी मला काल एका मोठ्या पानबाजाराचा व्यापार सांभाळताना दिसला. मी त्याला लांबूनच पाहात होतो. हजारो पानांच्या करंड्यांचे बाजारी हिशेब तो सेकंदात सांगत होता. त्याच्याभोवती कितीतरी व्यापाऱ्यांचा गराडा पडलेला होता. असंख्य नोटांच्या बंडलांची विभागणी प्रत्येकाच्या श्रमाप्रमाणे करताना त्याला धडाधड माणसे वाचता येत होती. हे सगळे पाहताना माझे मलाच काही उमजेना. क्षणभर आठवले, या पोराच्या पाटीवर मी सोडवायला घालत असलेले गणिताचे कोरडे उदाहरण खरे तर त्याच्या आयुष्याला नकोच होते. पाटीवरची गणिते ज्यांनी भराभर सोडवली होती अशीही पोरे मला आठवली. त्या पोरांमधून काही डॉक्टर, इंजिनिअर झालेही असतील. पण शाळेला न आवडलेल्या मुलाने आपल्या स्वत:च्या हिमतीवर असे स्वत:चे विश्व उभे केलेले पाहताना माझ्या डोळ्यात पाणी तरळले. माझ्या मास्तरकीच्या परिघाबाहेरचा हा अनुभव होता. आज काळ बदलला. पुस्तकातील धडे बदलले. विज्ञानाची शस्त्रे बदलली. माणसांचे जगही उलटे-सुलटे होताना मी पाहतो आहे. हे सगळे घडत असताना माझी मास्तरकी मात्र जिथे आहे तिथेच आहे. घोड्याला पाण्याजवळ घेऊन जावे की पाण्याला घोड्याजवळ आणावे या उत्तराच्या शोधातच.

एक बरे झाले आज या पारावरच्या दोन म्हाताऱ्या जिवांच्या गप्पांनी मला भानावर आणले. खरे तर त्यांच्या पोरांच्या पिढीचा मी शिक्षक होतो आणि त्यांच्या नातवंडांच्या पिढीचाही मीच शिक्षक आहे. काळाने मला ज्ञानपरिवर्तनवादाच्या अशा कसोटीवर उभे केले आहे जिथून प्रत्येक गोष्टीची सुरुवात आणि शेवटही होतो आहे. खरे तर आज माझ्यासमोर भूतकाळाने उद्याच्या भविष्यकाळाची उभी केलेली चिंता म्हणजे त्या आजोबांच्या गोष्टी होत्या. आजच्या मुलांच्या शारीरिक, मानसिक वाढीचा वेग हा पूर्वीच्या पिढीतील मुलांच्या तिप्पट बनला आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाने अनेक दृक्‌श्राव्य साधने आजच्या पिढीसमोर नयनरम्य बनवून उभी केली आहेत. या जगातले सोडाच, परग्रहावरील संवादही कानोकानी धडकताहेत. अशा या सृजनाची पताका हातात घेऊन उभ्या राहिलेल्या काळातील सळसळत्या बालमनाची पकड घेत त्यांच्या भावविश्वाची कोडी सोडविण्याची नैतिक जबाबदारी माझ्यातील शिक्षकावर येऊन ठेपली आहे. म्हणूनच चार भिंतींत न मावणाऱ्या या आजच्या मुलांशी मी कालच्या मुलांसारखाच वागणार आहे का? हीच साद माझ्यातील शिक्षकाला कोणीतरी पुन्हा पुन्हा घालतो आहे.

**– विठ्ठल नारायण कदम**
9823048126

---

# पड्यावरचे बालमजूर

नक्की असणार आणि ते त्यालाच त्याच्या भविष्यात जाणवणार.

दुर्दैवाने लहान मुले ही समाजाचा दुर्बल घटक मानली जातात, कारण ती जगण्यासाठी मोठ्यांवर अवलंबून असतात. याचाच जणू काही आपण गैरफायदा घेऊन त्यांच्यावर नृत्य, गायन, स्टंटबाजी अशा अपेक्षांचे ओझे ठेवून देतो, ते मूल यासाठी मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या किती तयार आहे याचादेखील विचार न करता. मूल जरी पालन-पोषणासाठी पालकांवर अवलंबून असले तरी त्याची स्वत:ची आवड, आनंद यासाठी कधीच परावलंबी नसते हे सत्य आहे. आपण मुलांचे पालक कमी चालक जास्त होतो. त्याला कुठे न्यायचे, त्याने काय करायचे याची सूत्रे आपण आपल्या हातात ठेवतो. 'बालपण हरवत आहे, बालमजुरी थांबली पाहिजे' असे आपण म्हणतो पण आजच्या मीडियाच्या मोठ्या प्रमाणात वाढत जाणाऱ्या छताखाली ही वेगळ्या प्रकारची बालमजुरीची उदाहरणे समोर येतात. आणि याची मुळे आपल्याच घरात आहेत याचा कोणी विचारच करताना दिसत नाही.

**प्रकाश अनभूले**
anbhuleprakash@gmail.com
9960460474

# खेळ!

- नीलिमा गोखले
- मंजिरी निंबकर




मुलांचा खेळ म्हणजे अशी कोणतीही कृती ज्यात मुलांना मजा वाटते. वेगवेगळ्या संस्कृतींत खेळाकडे वेगवेगळ्या नजरेने पाहिले जाते. काही संस्कृतींमध्ये बालकांच्या खेळाला खूप महत्त्व दिले जाते. खेळ अधिक अर्थपूर्ण होण्यासाठी प्रौढ बालकांच्या खेळात भाग घेतात. याउलट आपल्या संस्कृतीत खेळ हा मुलांचा असतो. प्रौढ त्यात क्वचितच सहभागी होतात. मोठ्या माणसांना काम करायला वेळ मिळावा म्हणून मुले खेळतात. मोठ्यांनी परवानगी दिली की मुले खेळतात. अभ्यास करून झाला की मगच मुले खेळतात.

संशोधन मात्र असे सांगते की मुलांच्या विकासासाठी आणि शिकण्यासाठी खेळ हे सर्वोत्कृष्ट साधन आहे. खेळताना मुले माती, पाणी, बाहुली, भांडी, चेंडू, ड्रम, रंग, ब्रश, कम्प्यूटर, मोबाईल अशा गोष्टी हाताळत असतात. पळत किंवा लंगडी घालत असतात. गटात खेळताना एकमेकांशी संवाद करीत असतात. क्वचित भांडत असतात. भांडणे सोडवत असतात. कधी नमते घेत असतात. त्यातून त्यांचा शारीरिक, सामाजिक, भावनिक, भाषिक व बोधात्मक असा सर्वांगीण विकास होत असतो. त्याचबरोबर समस्यापूर्ती करणे, विविधांगी विचार करणे, स्वनियंत्रण, स्मरणशक्तीचा विकास अशासारख्या महत्त्वाच्या क्षमताही खेळातून विकसित होतात. या साऱ्या क्षमता खरे तर औपचारिक शिक्षणासाठी गरजेच्या आहेत. तसेच खऱ्या अर्थाने सुशिक्षित होण्यासाठीही आवश्यक आहेत.

मूल जर अर्थपूर्णरीत्या शिकले पाहिजे असे वाटत असेल तर शिकण्याच्या प्रक्रियेची सुरुवात मुलांचे चित्त वेधून घेण्याने होते. एकदा का मुलांना एखाद्या गोष्टीत रस निर्माण झाला की मुले न सांगता दीर्घ काळ ती गोष्ट करीत राहतात, त्याच्याबद्दल विचार करतात आणि त्यातून शिकतात. उदाहरणार्थ मुले जेव्हा जलरंग व ब्रश घेऊन खेळत असतात आणि स्वतःच्या मनाने चित्रे काढीत असतात तेव्हा ती दीर्घ काळ म्हणजे अगदी २०-२५ मिनिटेसुद्धा त्यात गुंतून राहतात. रंगवता रंगवता त्यांच्या लक्षात येते की लाल आणि पिवळा रंग मिसळले की केशरी रंग तयार होतो. मग मुद्दाम ती आपल्या चित्राचा काही भाग केशरी करतात. मुलांना खेळायला आवडते. मुले आपणहून खेळतात आणि दुसऱ्या कुठल्याही उपक्रमापेक्षा खेळात अधिक काळ रमतात. मघाच्याच उदाहरणात जर आपण मुलांना लाल फूल आणि हिरवी पाने काढायला सांगितली तर मुले काही वेळातच तेथून उठून जातील. याशिवाय ती त्यातून काहीही शिकणार नाहीत.

खेळताना मुलांना ताण वाटत नाही. कारण खेळाची सूत्रे त्यांच्या हातात असतात. खेळताना काय करायचे, कसे करायचे हे मुले ठरवतात. त्यांना चुका करायची भीती वाटत नाही. शिकणे यशस्वी होण्यासाठी तणावमुक्त वातावरण फार महत्त्वाचे असते. म्हणूनच खेळ हे शिकण्याचे सर्वात यशस्वी माध्यम आहे.

**मैदानावरील खेळ:** मुलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी मैदानावरील खेळ लाभदायक असतात. पळणे, उड्या मारणे, लोळणे, रांगणे, चढणे, झोके घेणे, लोंबकळणे या सगळ्या कसरती मुलांच्या शारीरिक विकासासाठी तर मदत करतातच पण शरीराच्या हालचालींचे नियंत्रण व समन्वय विकसित होत असताना मेंदू व मज्जांच्या कार्याच्या विकासासाठीही त्या अत्यावश्यक असतात.

कित्येकदा जागेअभावी किंवा वेळेअभावी मुलांना अशा प्रकारच्या खेळाची संधी मिळत नाही. अभ्यासातून वेळ मिळत नाही किंवा मुलांना टी.व्ही. बघायचा असतो किंवा कम्प्यूटर गेम्स खेळायच्या असतात म्हणून मुले मैदानावर जायचा कंटाळा करतात. पण पालक व शिक्षकांनी पळापळीच्या खेळांचे महत्त्व जाणून घरी आणि शाळेतही अशा खेळांचा आग्रह धरला पाहिजे.

झाडे लावणे, बागकाम करणे, कुंपण किंवा बागेतल्या विटा रंगवणे, झाडाला टायर बांधून त्यावर झोके घेणे, अंगणात क्रिकेट खेळणे अशा छोट्या छोट्या गोष्टींमध्येही आई-बाबा मुलांना सहज सहभागी करून घेऊ शकतील.

**रचनात्मक खेळ:** रंग, खडू, चुरमुऱ्याचे कागद, ट्यूब व काड्या, रंगोमेट्री, ठोकळे अशा खेळण्यांशी खेळायला मुलांना खूप आवडते. या खेळांमध्ये काही पूर्व-निर्धारित निष्पत्ती नसल्याने (ओपन एंडेड खेळ) मुले मुक्तपणे प्रयोग करून पाहू शकतात. त्याच ठोकळ्यांनी मुले घर बांधतील किंवा डी.जे. बनवतील किंवा पार्किंग लॉट तयार करतील. जेव्हा तणावमुक्त वातावरणात असे खेळ खेळण्याची मुलांना संधी मिळते तेव्हा त्यांच्यात कल्पकता, सर्जनशीलता व समस्या सोडविणे यांसारखी महत्त्वाची कौशल्ये निर्माण होतात.

**कल्पकतेचे खेळ:** कित्येकदा मुले खेळता खेळता आपल्या रोजच्या आयुष्यातील व्यक्तींचे अनुकरण करतात. आई, बाबा, डॉक्टर, दुकानदार यांच्या भूमिका वठवतात. हळूहळू मुले



कल्पनेतील, गोष्टींच्या पुस्तकात वाचलेल्या किंवा टी. व्ही. वर पाहिलेल्या व्यक्तिरेखा रंगवू लागतात. कोणी छोटा भीम होतो तर कोणी डोरेमॉन. मुले वेगवेगळ्या भूमिकांच्या माध्यमातून जगाकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून बघतात.

आपल्या भूमिकेतील व्यक्तींनुसार मुले वेगळी वागतात, बोलतात, वेगळे शब्द व वाक्यरचना वापरतात. शाळा शाळा खेळताना ताई/दादा झालेल्या मुलांचे सूर खूपच समजूतदार असतात. किंवा ब्युटी पार्लर मध्ये मुले थ्रेडिंग, कट, फेशिअल असे शब्द वापरतात. दुकानदार झालेला मुलगा म्हणतो खूप 'कस्टमर' आलेत. अशा खेळात मुले काल्पनिक जगात वावरतात. त्यासाठी अमूर्त विचार करणे गरजेचे असते. अमूर्त विचार करण्यातून मुलांचा उत्तम बोधात्मक विकास होतो.

**नियमबद्ध खेळ:** खेळताना बहुतेकदा मुले आपले आपले नियम तयार करतात. उदाहरणार्थ कल्पकतेच्या खेळात काय करायला परवानगी आहे किंवा कुणाला अमुक एक गोष्ट करता येते हे ठरवणे. कार्तिक बाबा होणार, अनुष्का शाळा शाळाच्या खेळात ताई होणार असे नियम मुले नेहमी बनवतात. जसजशी मुले मोठी होतात तसतशी ती क्रिकेट, फुटबॉल यांसारखे नियमबद्ध खेळ खेळू लागतात. तरीही गल्लीत क्रिकेट खेळताना बॉल कुठे गेला म्हणजे चौकार किंवा षट्कार असे नियम ती बनवतच असतात. नियमबद्ध खेळांमुळे मुले स्वनियंत्रण शिकतात. नियमांच्या चौकटीत खेळण्यासाठी स्वतःच्या विचारांवर व वागणुकीवर नियंत्रण आवश्यक असते.

**मोठ्यांची भूमिका:** सुरुवातीलाच स्पष्ट केल्याप्रमाणे खेळ हा समाज व संस्कृती या दोन घटकांवर अवलंबून असतो. भारतीय समाजात प्रौढ व्यक्ती क्वचितच मुलांच्या खेळात सहभाग घेतात. पण जर मुलांच्या शिकण्याच्या आणि विकासाच्या प्रक्रियेसाठी खेळ किती लाभदायक असतो हे समजून घ्यायचे असेल तर मोठ्यांनी मनापासून मुलांच्या खेळात भाग घ्यायचा प्रयत्न केला पाहिजे. मुलांबरोबर खेळताना योग्य भाषेचा प्रत्यक्ष वापर करून आपण मुलांच्या भाषा विकासाला मदत करू शकतो. उदाहरणार्थ मुलांबरोबर आपण भेट कार्ड बनवत असलो तर आपल्याला हवी असलेली गोष्ट कशी मागायची हे आपण 'तुझे लाल रंगाचे काम संपले की तू मला तो ब्रश देशील का?' असे म्हणून शिकवू शकतो. तेव्हा एखादी गोष्ट हवी असेल तर ओढून घ्यायची नसते तर असे विचारायचे असते हे मुले शिकतात.

याशिवाय सभोवतालच्या विविध गोष्टींबद्दल गप्पा मारून आपण मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देऊ शकतो. जसे, ठसे काम करताना निर्माण झालेल्या आकारांमध्ये 'इथे मला झाड दिसते आहे' किंवा 'अशी शेपटी काढली की पोपट होतोय बघ,' असे म्हणून मुलांना कल्पकतेने त्या खेळाकडे बघायला शिकवू शकतो. खेळता खेळता मुलांच्या शब्दसंग्रहात आपण संवादातून भर घालू शकतो. 'माती मऊ मळली की हवा तो आकार करता येतो,' असे म्हणत आपण मऊ आणि मळणे असे दोन नवे शब्द मुलांना सांगू शकतो. हे बोलणे माती मळताना झाल्यामुळे मळण्याची कृती काय असते व मऊ म्हणजे कसला स्पर्श हे मुले चटकन शिकतात. खेळता खेळता आपण मुलांना कामाचा किंवा कृतीचा नियोजनबद्ध विचार कसा करायचा ते दाखवू शकतो. उदाहरणार्थ सरबत करताना पातेल्यात आधी पाणी घ्यायचे. मग त्यात अर्धे लिंबू पिळायचे, २ चमचे साखर घालायची, अर्धा चमचा मीठ घालायचे, मग ते मिश्रण ढवळायचे. मग गाळून पेल्यात ओतायचे आणि प्यायचे.

घरच्या घरी मुलांचे खेळ अगदी साधे साधे असू शकतात. अगदी रोजचा स्वयंपाक, स्वच्छता, बाहेर जाण्यासाठी तयार होणे यातील मुलांचा सहभाग हादेखील खेळच आहे. मात्र एक लक्षात ठेवायचे ते म्हणजे मुले जर शिकायची असतील तर त्या कृतीत मुलांना रस वाटला पाहिजे आणि चुका करण्याची भीती वाटता कामा नये. याची काही उदाहरणे आपण पुढे पाहू.

१. स्वयंपाक – मुलाला प्रथम विचारा की त्याला/तिला स्वयंपाकात मदत करायची आहे का. थोड्याशा मदतीने मूल स्वतः करू शकेल असा एखादा पदार्थ निवडा. उदा. कोशिंबीर, ताक किंवा पुऱ्या लाटणे. मुले 'स्वयंपाक' करण्याचा आनंद घेत असताना मुलांशी पदार्थातील घटक, कृती याबद्दल बोलता येईल. भाज्या किंवा फळांची नावे, मसाल्याच्या पदार्थांची किंवा भांड्यांची नावे सांगा. वेगवेगळ्या कृतींना काय म्हणतात ते सांगा (निवडणे, धुणे, साल काढणे, पिळणे, हलवणे इ.)

२. आवरणे – 'मला घड्या घालायला मदत करतोस का?' असे विचारून 'चल, आपण प्रत्येकाच्या कपड्यांचा वेगवेगळा गठ्ठा करूया,' किंवा 'आधी छोट्या कपड्यांच्या घड्या करूया,' अशा गप्पा मारत काम केले की मुले सहजच कामाशी संबंधित नवे शब्द शिकतात.

३. उद्याची तयारी– 'उद्या आपण आजीकडे जाणार आहोत. आपण आजीसाठी काय घेऊन जाऊया?' अशा प्रश्नाचा मूल विचार करेल आणि स्वतःच्या कल्पनेतून काहीतरी बनवू शकेल.

मोठ्यांच्या सहभागाने खेळ अधिक अर्थपूर्ण करता येतात आणि मूल त्यातून अनेक कौशल्ये व क्षमता शिकते. मात्र खेळाचे हे अनुभव तणावमुक्त असले पाहिजेत. त्यात कुठेही 'मी तुला शिकवत आहे' असा आविर्भाव किंवा मूल्यमापन नको याची मोठ्यांनी खबरदारी बाळगली पाहिजे.

**डॉ. नीलिमा गोखले**
neelima.gokhale@gmail.com
9823053272

**डॉ. मंजिरी निंबकर**
manjunimbkar@gmail.com
9822040586

Published & Posted on 16 April 2015
Posted at Marketyard PSO, Pune 411037.
on 16th of each month

RNI No. MAH MAR 2001/4166
Registered No. PCW/ 026/ 2015-2017

## शहाणी वेबपणे

# काळ्या फळ्यावरची रंगीत अक्षरे!

२००६ सालची गोष्ट. बॉस्टन शहरात एक तरुण हेज फंड या बलाढ्य कंपनीमध्ये विश्लेषक म्हणून काम करत होता. पंधराशे मैल दूर असलेल्या न्यू ऑर्लीन्स या शहरात राहणाऱ्या आपल्या भावंडांचे तो फावल्या वेळात ट्यूटरिंगही करत असे. अवघड संकल्पना स्पष्ट करायला त्याने काही यूट्यूब व्हिडिओ बनवून आपल्या भावंडांना पाठवले. काळ्या स्क्रीनवर हाताने लिहिल्यासारखी उमटणारी रंगीत अक्षरे व आकृत्या, आणि ते लिहिता लिहिता स्पष्टीकरण देणारा त्या तरुणाचा आवाज असे काहीसे त्या व्हिडिओंचे स्वरूप होते. म्हणजे फळ्यावर लिहून शिकवल्यासारखेच.

भावंडांकडून मिळालेली प्रतिक्रिया मोठी गमतीदार होती. ती म्हणाली, 'आम्हाला तू असा यूट्यूबवालाच जास्त आवडतोस.' या उर्मट प्रतिक्रियेचा त्या तरुणाला जरा रागच आला पण नंतर थोडा विचार केल्यावर त्याला तिच्यामागचे कारण नीट उमगले. बरोबरच होते ना! यूट्यूब व्हिडिओ कधीही थांबवता येत होते, काही समजले नाही तर पुन्हा पुन्हा पाहता येत होते. यामध्ये आपण आपल्या शिक्षकाचा वेळ घालवतोय अशा अपराधी भावनेचा मनाला स्पर्श होण्याचा प्रश्नच येत नव्हता. कुठलीही नवी संकल्पना शिकत असताना सर्वात त्रासदायक गोष्ट काय असेल तर कुणीतरी सतत समोर बसून म्हणणे, 'समजलं ना? शिरलं का डोक्यात?'

या व्हिडिओंचा एक अनपेक्षित परिणामही झाला. यूट्यूबवर टाकताना तरुणाला ते प्रायव्हेट ठेवण्याची काही गरज वाटली नव्हती त्यामुळे जगाला पाहण्यासाठी ते खुले होते. यूट्यूब कमेंट्स आणि तरुणाला येणारी पत्रे यांची संख्या वाढू लागली. सर्वांनाच हे व्हिडिओ खूप उपयुक्त वाटत असल्याचे कळत होते. हळू हळू तरुणाच्या हेही लक्षात आले की हे व्हिडिओ कधीच जुने होणार नाहीत. अनेक पिढ्या त्यांचा वापर करून शिकू शकतील.

हा सगळाच व्याप पुढे वाढला, त्यातून www. khanacademy.org चा जन्म झाला आणि जगभरात एक नाव पोचले– सलमान खान. (हा आपला सल्लूभाई नाही हे लक्षात आले असेलच.) आपली भल्या मोठ्या पगाराची नोकरी सोडून सलमानने आपली पूर्ण ऊर्जा खान अकॅडमीकडे वळवली. गणित, जीवशास्त्र, खगोल, भौतिक, अर्थ, कलेचा इतिहास, जनुकीय तंत्रज्ञान... आज जवळजवळ आपण म्हणू त्या विषयातील मूलभूत संकल्पना स्पष्ट करणारे सुमारे २४०० व्हिडिओ खान अकॅडमीने बनवले आहेत. स्वरूप तेच. काळ्या स्क्रीनवरची रंगीत अक्षरे (त्यात आता फोटोंची भर पडली आहे) आणि सलमानचा आवाज. या आवाजाचेही एक वैशिष्ट्य आहे. त्यात कुठेही 'मी तुम्हाला शिकवतो आहे' हा बडेजाव नाही. अतिशय मैत्रीपूर्णरीत्या हा आवाज आपल्याला सहज पेशींच्या अंतरंगात आणि अवकाशाच्या अमर्यादेत घेऊन जातो.

काही शिक्षकांची पत्रे वाचून सलमानला या व्हिडिओंचा एक वेगळाच पैलू लक्षात आला. हे व्हिडिओ मुलांनी घरी होमवर्क म्हणून पाहायचे– आपापल्या सोईनुसार, गतीनुसार, आणि मग वर्गात त्यांवर चर्चा, गटकाम, शंकानिरसन, प्रकल्प करणे इत्यादी. म्हणजे वर्गाला एकगठ्ठा एकाच गतीने शिक्षकांनी 'शिकवण्यात' जो वेळ जातो तो अधिक अर्थपूर्णरीत्या वापरता येईल. सलमानच्या भाषेत सांगायचे तर अशा प्रकारे तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्याला आपले वर्ग अधिक मानवी बनवता येतील (Using technology to humanize the classrooms).

केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर अनेक प्रौढांनाही हे व्हिडिओ खूप आवडतात. शालेय शिक्षणामधून सुटून गेलेल्या संकल्पना शिकणे, पूर्वी शिकलेल्याची उजळणी हे कोणत्याही संकोचाविना करणे त्यांना शक्य होते. आज सुमारे २ ते ३ लाख लोक हे व्हिडिओ रोज पाहतात.

दुर्दैवाने हे सगळे व्हिडिओ केवळ इंग्रजी, स्पॅनिश, फ्रेंच आणि पोर्चुगीज भाषांमध्ये उपलब्ध आहेत. मराठी सबटायटल्सचा पर्याय आपण निवडू शकतो मात्र ते भाषांतर फारच वाईट आहे. खान अकॅडमी हमारी बोली (हिंदी–उर्दू) या यूट्यूब चॅनलवर काही डब केलेले व्हिडिओ पाहता येतील. भविष्यात अधिकाधिक भाषांमध्ये यांचे रूपांतर होईल अशी आशा करूया.

**मधुरा राजवंशी**
rmadhuraa@gmail.com
8275369702